Exh-1/B

*दाव्याची मुळ प्रत*

**मे.दिवाणी न्यायाधीश साहेब(क.स्तर)अंबाजोगाई यांचे न्यायालयात,**

रे.दि.दा.नं. /2025

**वादी :–** 1) **राधीका पि.सोमनाथ नागरगोजे,**
वय 1 वर्षे, धंदा काही नाही,
रा.अंबलटेक ता.अंबाजोगाई जि.बीड.
ह.मु घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड.
अ.पा.क आई वादी क्र. 2 नामे.शितल भ्र.सोमनाथ नागरगोजे.

2) **शितल भ्र.सोमनाथ नागरगोजे,**
वय 27 वर्षे, धंदा घरकाम व शेती
रा.अंबलटेक ता.अंबाजोगाई जि.बीड.
ह.मु घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड.

**विरुध्द**

**प्रतिवादी :–** **सोमनाथ पि.संजय नागरगोजे,**
वय 29 वर्षे, धंदा मजुरी व ड्रायव्हर,
रा.अंबलटेक ता.अंबाजोगाई जि.बीड.
ह.मु घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड.

**प्रकरण : चिरकाल मनाई हुकुम मिळणे बाबत.**

**वादी आपला दावा प्रतिवादींच्या विरुध्द खालील प्रमाणे सादर करीत आहे.**

**1) हे की,** वादी व प्रतिवादी हे मौजे अंबलटेक ता.अंबाजोगाई जि. बीड ह.मु घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहिवाशी असुन वादी क्र. 2 व प्रतिवादी हे आपसात पती पत्नी असुन वादी क्र.1 ही वादी क्र. 2 व प्रतिवादी यांची मुलगी आहे.

**2) हे की,** वादी व प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुंटूबाचे घटक असुन त्यांच्या हिंदु एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जीत मिळकतीचे उत्पन्नावर खरेदी केलेले मौजे.घांटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड येथिल मिळकत फॅमीली अरेंजमेंट म्हणून प्रतिवादी यांच्या नावे नॉमीनल केलेल्या आहेत. परंतु या जमिन मीळकतीच्या वाटण्या आद्याप पावेतो झालेल्या नाहीत. त्या जमिनीचा

Shital

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर
अंबाजोगाई

पान नं. 2 वर......

तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार | गाव | नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1) | 754 | 0.02.23 | 0.02 | घाटनांदुर | प्रतिवादी |

ज्याची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे. पूर्वेस – 20 फूट रस्ता, पश्चिमेस – 20 फूट रस्ता, दक्षिणेस – आरसुडे, उत्तरेस – गट क./प्लॉट नं. 68,69

येणेप्रमाणे चतु: सिमेच्या आतील एकुन क्षेत्र 0 हे.02.23 आर मिळकतीस दाव्यात वादग्रस्त जमीन म्हणुन संबोधण्यात येत आहे. सदर मिळकती मध्ये वादी यांचा कायदेशीर हिस्सा असुन, या मिळकतीच्या आजतागायत वादी व प्रतिवादी यांचेमध्ये कधीही वाटण्या झालेल्या नसुन सदर मिळकत वादी व प्रतिवादी यांचे संयुक्तीक कब्जे ताबा उपभोगात आहे.

**3) हे की,** प्रतिवादी हे वेगवेगळया व्यसनांचे आहारी गेलेले असुन कुटूंबाच्या अत्यावश्यक गरजे शिवाय केवळ आपल्या व्यसनपुर्ती करीता वादग्रस्त मिळकत कागदोपत्री त्यांच्या नांवे असल्याचा गैरफायदा घेवुन ते बेकायदेशिर रित्या ईतरांना विक्री करण्याच्या अत्यंत घाई गडबडीत असून ते लवकरच इतरांच्या हक्कात रजिस्टर्ड खरेदीखत करून देण्याची अथवा अन्य व्यक्तीचे नांवे कोणत्याही दस्ता अधारे वर्ग करण्याच्या अथवा गहान,दान, हस्तांतर करण्याच्या, अथवा त्यावर बोजा निर्माण दाट शक्यता आहे.तसे झाल्यास वादी यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे व प्रकरणात अधिक गुंतागुंत निर्माण होणार आहे. ज्याची वादींना खात्रीलायक माहीती मिळाल्याने वादींनी दि. 07/09/2025 रोजी प्रतिवादीची समक्ष भेट घेवून वादग्रस्त जमिन अन्य कोणास विक्री न करण्याची विनंती केली असता प्रतिवादी वादी ला म्हणाले की ही मिळकत माझे मालकीची आहे, मी विकल्याशिवाय राहणार नाही तुमचा या मिळकतीशी काहीही संबंध नाही, तुम्ही या मिळकतीत पाय ठेवायचा नाही असे म्हणुन धमकी दिली व वादी यांचा वादग्रस्त मिळकतीवरील वादीच्या शांततामय ताबा उपभोगास हरकत अडथळा केला. करीता वादीला मा.कोर्टात प्रतिवादींचे विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले असून दावा हक्क प्राप्तीची दिनांक 07/09/2025 ईसवी ही असुन दाव्याचा जवाब देण्याचा जवाब देण्याची प्रतिवादीवर जवाबदारी आहे.

Shital

पान नं. 3 वर......

**4) हे की,** वादग्रस्त मिळकत ही मौजे.घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि. बीड व वादी व प्रतिवादी हे मौजे.अंबलटेक ता.अंबाजोगाई जि.बीड ह.मु घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहिवाशी असुन मा.न्यायालयाच्या स्थळ सिमेचे आतील असल्याने प्रस्तुतचा दावा मा.न्यायालयात दाखल करण्यात येत आहे.जो मा.न्यायालयास दाखल करून घेवुन ऐकण्याचा व चालविण्याचा व त्यावर न्याय निर्णय देण्याचा पुर्ण अधिकार आहे.

**5) हे की,** वादींचा दावा चिरकाल मनाई हुकूम मिळणे बाबत असल्याने वादींनी दाव्याचे मुल्य आर्थिक मर्यादेसाठी व कोर्ट फिस साठी रक्कम रू. 1000/— करीत असुन त्यावर ठराविक कोर्ट फिस रक्कम रू. 200/— दिली असुन जी योग्य व पुरेशी आहे.

**तरी विनंती की,**

वादींचा दावा प्रतिवादींच्या विरूध्द खालील प्रमाणे डिक्री करण्यात यावा.

**अ)** मौजे.घांटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड येथिल जमीन गट क्र. 754 क्षेत्र 0 हे. 02.23 आर आकार 0.02 पैसे ज्याची चतुःसिमा पुढील प्रमाणे आहे. पूर्वेस — 20 फूट रस्ता, पश्चिमेस — 20 फूट रस्ता,दक्षिणेस — आरसुडे उत्तरेस — गट क्र./प्लॉट नं. 68, 69 या चर्तुःसिमेच्या आतील वादग्रस्त मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या हिंदु एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जीत मिळकतीचे उत्पन्नावर खरेदी केलेली मिळकत असुन, सदरची मिळकत प्रतिवादी ने अन्य कोणत्याही व्यक्तीचे नांवे कोणत्याही दस्ता अधारे वर्ग करू नये. अथवा गहान,दान,हस्तांतर करू नये, अथवा त्यावर कसल्याही प्रकारचा बोजा निर्माण करू नयेत, अशा प्रकारचा चिरकाल मनाई हुकुम वादीच्या हक्कात देण्यात यावा.

**ब)** वादीस प्रतिवादीकडुन प्रस्तुत दाव्याचा खर्च देण्यात यावा.

**क)** वादी अन्य ज्या मागणीचे कायद्यान्वये हक्कदार ठरतात ते वादीच्या हक्कात आणि प्रतिवादीच्या विरूध्द मंजुर केल्या जाव्यात.

सोबत वादी क्रं.2 यांचे शपथपत्र दिले ते खरे आसे फक्त.

**दिनांक :— 29 /09/2025.** **वादी,**

Shital

**शितल भ्र.सोमनाथ नागरगोजे**

( स्वतः व अज्ञान वादी क्रं.1 करीता )

पान नं. 4 वर......

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करते की, सदरील दाव्यातील सर्व मजकुर माझ्या उत्तम माहिती, समजुती व वाचून/वाचून दाखविल्या नुसार खरा असुन त्यावर मी समजून उमजून सहया/तसदिका केल्या आहेत त्या ख–या व बरोबर आहेत असे फक्त.

**दिनांक :– 29 /09/ 2025.** **वादी,**

Shital

**मार्फत,** **शितल भ्र.सोमनाथ नागरगोजे**

( स्वतः व अज्ञान वादी क्रं.1 करीता )

**ॲड.एम.एम.रूपनर.**